दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –४१ शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-41 Friday, Dt.18 October 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

निवडणूक शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून आदेश निर्गमित

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने काही निर्बंध घातले आहेत. तशा स्वरूपाचे आदेश जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.

सदरील आदेश प्रत्येकावर तामील करणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिस विभागाने जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, सदरील आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहतील, असेही निर्गमित आदेशांमध्ये नमूद आहे. वेगवेगळ्या आदेशात पुढील बाबी नमूद आहेत.

शासकीय, निमशासकीय परिसर

जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि विश्रामगृहांच्या आवारात कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाजाचा वापर राजकीय कामासाठी करणे, रॅली काढणे, निवडणुकीसंबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, किंवा कार्यालयीन आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे, किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इ.बाबी नियंत्रित करणे या कृती करण्यास निर्बंध घालण्यात आला आहे.

सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण

निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपित करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणुकीच्या कालावधीत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच पूर्व परवानगी संपल्यानंतर ते दूर नष्ट करून इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

मतपत्रिका छपाई

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी, मुद्रणालय मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव, त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना मतपत्रिका छापण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत.

यावरही असतील निर्बंध

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण इ. करण्यावर तसेच जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर, राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे वाहनाच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध असतील.

रहदारीस अडथळा नको

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेटस्, कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

ध्वनीक्षेपकाचा वापर

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी व रात्री दहा नंतर कोणत्याही फिरत्या वाहनांवर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधित घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

प्रचार वाहनांवरील झेंडा, कापडी फलक

प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून दोन फूट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. वाहनावर लावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

मारहाणीत युवकाचा मृत्यू

शेवगाव/ प्रशांत बाफना : मुलीशी बोलणाऱ्या युवकासह त्याच्या दोन मित्रांना, मुलीच्या नातेवाईकांनी केलेल्या मारहाणीत ,जखमी झालेल्या एका युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना सोमवार दि. १४ रोजी घडली आहे. तालुक्यातील ठाकूर निमगाव येथे तीन युवकांना बुधवार (दि. ९) रोजी मारहाण करण्यात आली. जखमी मधील एका युवकाने दुसऱ्या दिवशी गुरुवार दि. १० रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात संबंधितांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील जखमी प्रमोद उर्फ बंटी राजेंद्र चव्हाण याचा, अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटने प्रकरणी मयूर कैलास रोठे याने फिर्यादी दाखल केली आहे. फिर्यदी व त्याचे मित्र प्रमोद राजेंद्र चव्हाण, सार्थक अशोक काकडे हे तिघे जण मोटारसायकल वरून शेवगाव बस स्थानक येथे गेले होते. यावेळी प्रमोद चव्हाण हा एसटी बस मध्ये बसलेल्या त्याचे मामाच्या मुलीशी बोलत होता. त्यावेळी बारक्या पठाण याने मोबाईल मध्ये शूटिंग घेऊन, भारत आसाराम कातकडे यांना पाठवली.

दरम्यान, तिघे मित्र निमगाव येथे गावी परतले. यावेळी मराठी शाळेत बसलेले असताना भारत आसाराम कातकडे, अशोक ताराचंद निजवे, बारक्या पठाण, हे तिथे आले. यावेळी भारत याने त्याचे हातातील लोखंडी रॉडने प्रमोद चव्हाण यास मारहाण करण्यास सुरुवात केली. प्रमोद यास सोडवण्यासाठी फिर्यादी व सार्थक काकडे गेले असता, अशोक निजवे, बारक्या पठाण यांनी तिघांना लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व भारत कातखडे यांच्या घराकडे घेऊन जाऊन तिघांना सुताच्या दोरीने बांधून ठेवले. यावेळी भारत कातकडे, शारदा भारत कातकडे, अशोक निजवे, बारक्या पठाण, ताराचंद निजवे, पांडू आसाराम कातकडे यांनी लोखंडी रॉडने मारहाण केल्याचे फिर्यादी मध्ये म्हटले आहे. अज्ञात इसमाने पोलिसांना फोन करुन कळविले असता पोलीस तिथे आले व त्यांनी त्यांच्या तावडीतून सोडविले असे म्हटले आहे.

दरम्यान या घटनेत जखमी झालेल्या तिघांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले. यातील जखमी प्रमोद चव्हाण याचा उपचारादरम्यान सोमवारी मृत्यू झाला आहे. शवविच्छेदनानंतर त्याच्यावर सायंकाळी उशिरा त्याच्या गावी पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी पांडू कातकडे आणि शारदा कातकडे यांना ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहिती दिली आहे. तपास उपनिरीक्षक अशोक काटे हे करीत आहे

'समृद्धी'च्या सभासदांची दिवाळी होणार गोड

कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांची १०० रुपये वाढीव हप्त्याची घोषणा

जालना /प्रतिनिधी

समृद्धी साखर कारखान्याच्या सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगाम २०२३-२४ मधील गाळप झालेल्या उसाचा पहिला २८०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे देण्यात आला. आता दिवाळी सणानिमित्त कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी १०० रुपये प्रती मे टन प्रमाणे वाढीव हप्ता देण्याची घोषणा केली आहे.हा वाढीव हप्ता दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहे. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी मंगळवारी (दि.१७) दिली आहे.

शेतकऱ्यांच्या उसाला समृद्धी कारखाना उच्चांकी भाव देत असल्याने शेतकरी आनंदी आहेत. उच्चांकी भावाची परंपरा यंदाही 'समृद्धी'ने कायम ठेवली असून पहिला हप्ता २ हजार ८०० रुपये प्रतीटन प्रमाणे दिल्यानंतर दिवाळी सणासाठी १०० रुपयाचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय सतीश घाटगे यांनी जाहीर केला आहे.

कपाशी, सोयाबीन या पिकाचे अतिवृष्टीत नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून हातात पैसा आला नाही. आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी समृद्धीने १०० रुपयाचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय घेतला. लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल.

सतीश घाटगे , चेअरमन, समृद्धी शुगर्स

नामनिर्देशनावेळी पाच व्यक्ती, तीन वाहनांपर्यंत परवानगी

बीड : निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहनांचा समावेश नसावा. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

शस्त्र जमा करण्याची कार्यवाही

शस्त्र परवानाधारकांची शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने आचारसंहिता कालावधीत सदरील शस्त्रे जमा करावीत. तसेच आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर संबंधितांना त्यांची शस्त्रे परत करण्याची कार्यवाही पोलिस विभागाने करावी. यामध्ये बँक, महत्त्वाची कार्यालये, संस्था, विद्युत केंद्र व इतर महत्त्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून सदरील शस्त्रांबाबत कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद आहे.

धुंडा महाराज महाविद्यालयात मराठी मंडळाची स्थापना

देगलूर ।प्रतिनिधी

कलागुणांचे संवर्धन करून त्याच्या सर्जनशीलतेला प्रमुख प्रा. डॉ. गोविंद रामदिनेवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. प्रा.डॉ. रवींद्र बेंबरे यांनी बैठकीची प्रस्तावना केली. वाङ्मय मंडळाच्या अध्यक्षपदी सवार्नुमते कु. गायत्री शंकरराव पाटील तिची निवड झाली तर उपाध्यक्ष म्हणून कु. अमृतवाड शैलजा आणि कु. सुजाता परमेश्वर वझरगेकर यांची निवड झाली.

ना.धनंजय मुंडे हे एका कार्यक्रमानिमित्त आळंदी देवाची येथे आले असता, त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले...

देगलूर ।प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी पक्षाच्यावतीने देगलूर-बिलोली विधानसभा मतदार संघातून माजी नगरसेवक सुशीलकुमार देगलूरकर यांना उमेदवारी जाहीर.उमेदवारी मिळाल्याबद्दल देगलूर बिलोली मतदारसंघातून अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुशीलकुमार देगलूरकर यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

आ. शेखर निकम यांची परशुराम घाटात तातडीची पाहणी

संरक्षक भिंतीचे काम त्वरित सुरू करण्याचे निर्देश

चिपळुण / प्रतिनिधी: मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात संरक्षक भिंत खचल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच मुंबईत असलेले चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर निकम यांनी तातडीने मुंबईवरून परत येताच घटनास्थळी भेट दिली. घाटातील खचलेला संरक्षक भिंत पाहून त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून सदर कामाची पाहणी केली आणि त्यावर तातडीने कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश दिले.

आ. शेखर निकम यांनी सांगितले की, परशुराम घाट हा प्रवाशांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. या ठिकाणी संरक्षक भिंतीचा काही भाग खचल्यामुळे वाहतूक ठप्प होऊ नये, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करावे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीची सोय सुरळीत ठेवण्यासाठी घाटात सुरू असलेल्या कामावर आ. निकम स्वतः लक्ष ठेवणार असून, त्यासाठी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून तातडीने उपाययोजना करण्यात येतील असे सांगितले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

अभ्रष्ट ते भ्रष्ट करिता सायास

''सरकारी मालकीची साधनसंपत्ती यापुढे लिलावातूनच विका'' अशा अर्थाचा दंडक सर्वोच्च न्यायालयाने घालून दिला; तो पाळण्यात विद्यामान सत्ताधारी भाजपस रस नाही...

दशकभरापूर्वीच्या सत्तांतरामागे कथित दूरसंचार घोटाळा हे एक कारण होते. मनमोहन सिंग सरकारातील दूरसंचारमंत्री ए. राजा हे त्यातील मुख्य आरोपी. हा 'घोटाळा' (?) कसा झाला हे आठवणे आता मनोरंजक ठरेल. याचे कारण दूरसंचारातील ज्या निर्णयांमुळे भ्रष्टाचार झाला असे तत्कालीन विरोधी पक्ष भाजपस त्या वेळी वाटले तोच मार्ग सत्ताधारी असलेल्या भाजपने दूरसंचारासाठी आत्ता निवडलेला असून त्या वेळी ज्या मार्गास खासगी कंपन्यांचा विरोध होता तोच मार्ग आता खासगी कंपन्यांस हवाहवासा वाटू लागला आहे. दूरसंचार क्षेत्रातील या बदलत्या कंपनलहरी समजून घेणे आवश्यक.

'त्या'वेळी दूरसंचारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भाजपने केला कारण तत्कालीन दूरसंचारमंत्री राजा यांनी दूरसंचारासाठीची आवश्यक कंपनलहरींची (स्पेक्ट्रम) कंत्राटे प्रशासकीय अधिकारात दिली. त्यांचा लिलाव केला नाही. तो केला असता तर केंद्र सरकारच्या तिजोरीत एक लाख ७६ हजार कोटी रुपये जमा झाले असते, ते बुडाले; म्हणून दूरसंचाराचा राजा-निर्णय हा 'एक लाख ७६ हजार कोटी रुपयांचा घोटाळा' असे तर्कट तत्कालीन महालेखापाल विनोद राय यांनी लावले आणि विरोधी पक्षीय भाजप, माध्यमे यांनी तेच तुणतुणे वाजवायला सुरुवात केल्याने घोटाळ्याचा आरोप सिंग सरकारला चिकटला. नंतर सरकार गेल्यावर कळले की असा काही भ्रष्टाचार झालेलाच नव्हता. सर्वोच्च न्यायालयातही हे सत्य समोर आले. कल्पनेत असलेले उत्पन्न प्रत्यक्षात न मिळाल्याने वास्तवात भ्रष्टाचार झाला; असे मानले गेले. ही कंपन-कंत्राटे दूरसंचार 'टू जी' सेवेसाठी होती. सद्या:स्थितीत 'फाईव्ह जी', 'सिक्स जी' यांची चर्चा सुरू आहे

श्रीक्षेत्र नागनाथ मानूर येथील नऊगणयात्रा उत्साहात संपन्न

मानूर /प्रतिनीधी

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात असलेले श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथील हजारो वर्षाची परंपरा असलेली नागनाथ देवस्थान व नागेश संप्रदायाची प्राचीन अशी आश्विन शुद्ध त्रयोदशी ची गणयात्रा म्हणजेच नऊगणयात्रा. ही गणयात्रा वार मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ व बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ या दोन दिवसांमध्ये अतिशय भक्तीपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाली.

मानूर नागनाथ देवस्थान हे नागेश सांप्रदायाचे मूळ असल्याकारणाने या गण यात्रेस अनन्यसाधारण महत्त्व आहे, म्हणून या गणयात्रेसाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून शिष्य सदभक्त या यात्रेसाठी आले होते. त्याचबरोबर श्री क्षेत्र कपिलाधार बीड ते श्रीक्षेत्र मानूर ही पदयात्रा आली होती तसेच ही पदयात्रा गेल्या ३० वर्षापासून येत आहे. पद यात्रेमध्ये अबाल वृद्धांसोबत अनेक नवतरुण या पदयात्रेमध्ये सहभागी झाले होते. त्याचबरोबर श्री दत्त मंदिर करंजी (ता.आष्टी) ते श्रीक्षेत्र मानूर नागनाथ ही पदयात्रा ही गेल्या दोन वर्षापासून मानूर येथे येत आहे याही पदयात्रा मध्ये असंख्य लहान थोर मंडळींसोबत स्त्रिया सुद्धा भजन व देवाचं नामस्मरण करत मानूर येथे आले होते यांच्या स्वागतासाठी श्रीक्षेत्र नागनाथ देवस्थानचे मठाधिपती श्री गुरु मानूरकर महाराज व मानूर ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी मानूर येथील बसस्टँड वर आणण्यासाठी गेले होते. अतिशय जल्लोषपूर्ण वातावरणामध्ये दोन्ही पदयात्रा मानूर या ठिकाणी आल्या त्यानंतर मुख्य नऊ गण यात्रा उत्सवात सुरुवात झाली. प्रथमतः नऊ स्वामींचे खौर करण्यात आले. त्यानंतर मठाधिपती यांचे मंदिरामध्ये आगमन झाले आणि मुख्य गणयात्रेस प्रारंभ झाला. या गणयात्रेच्या माध्यमातून एक मुकपट करण्यात आला. ज्यामध्ये हे नऊगण खेळ खेळतात आणि यामध्ये राजा, प्रधान,कामगार आणि शेतीच्या बाबतीमध्ये हा प्रसंग दाखवण्यात आला आणि यामध्ये चोर चोरी करतो त्याला पकडून राजा प्रधान शिक्षा देतात आणि त्याच्याकडून जे काही चोरले आहे ते प्राप्त करून घेतात हे झाल्यानंतर त्या ठिकाणी पूजा करण्यात आली आणि पूजा केल्यानंतर त्या खेळाचा प्रसाद म्हणून उपस्थित सर्व सदभक्त शिष्य व ग्रामस्थ यांना ज्वारीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर नियमाप्रमाणे मठाधिपती व नऊगण यांचे औक्षण करण्यात आले त्यानंतर या नऊ गणायात्रेमध्ये मुख्य आकर्षण असलेले वीरभद्र देवता यांच्या धूपाची पूजा होऊन धूप काढण्यात आले यावेळी मठसंस्थान ते गावातील काही ठिकाणापर्यंत हा धूप खेळवण्यात आला त्यानंतर परत मठसंस्थानमध्ये आलेले अनेक शिष्य, सदभक्त ,नवतरुण, महिला स्वामी मंडळीं समवेत अनेक व्यक्तीनी धूप खेळला. या धुपाची सांगता विरभद्र देवता यांची आरती करून झाली. वार बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी नऊगण यांच्या हस्ते सद्गुरु नागनाथ

महाराज व सर्व दैवता यांना नैवेद्य दाखवण्यात आला आणि महाप्रसादाचे वाटप झाले त्यानंतर रात्री सात वाजता या नऊ गण यात्रेचे सांगता व कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मठसंस्थांनमध्ये श्रीमद् वरदशंकर भगवान यांची महापूजा करून कथा महात्म्य सर्व भक्तांना सांगण्यात आले आणि प्रसाद वाटप करून या नऊगण यात्रेची सांगता झाली. या कार्यक्रमामध्ये शिरूर कासार येथील नायब तहसीलदार मा श्री शिवनाथ खेडकर व पुरवठा निरीक्षक शिवदास गावडे , तसेच मानूर सज्जाचे तलाठी भगवान टाक त्यांच्या सहकाऱ्यांनी या यात्रेस भेट दिली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने शिष्य सदभक्त या प्राचीन व ऐतिहासिक नऊ गणयात्रेस उपस्थित होते.

बारसवाडा शाळेचा आदर्श शाळा म्हणून गौरव; मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तालुक्यात प्रथम

अंबड ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा केंद्र डोणगाव तालुका अंबड शाळेचा आदर्श शाळा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला,यावेळी अंबड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण,शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,लक्ष्मीकांत आटोळे,केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन शाळेचा गौरव करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राधाकिसन सावंत तर प्रमुख पाहुणे म्हणून सुभाषराव चाटे,बी.एम बांगर,मुजीब पटेल,उपसरपंच गजानन सावंत,केंद्रप्रमुख योगेश झांबरे,मदन पवार आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली. वाचन प्रेरणा दिनानिमित्त व महावाचन उत्सव २०२४ निमित्त शाळेमध्ये आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांनी केले. यावेळी डोणगाव केंद्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा मानाचा फेटा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आयोजित शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये बारसवाडा येथील शिक्षक श्रीधर यशवंतराव कुलकर्णी यांनी भाषा विषयावर आधारीत तर गोकुळ बोबलट यांनी विज्ञान विषयावर आधारीत तयार केलेल्या व्हिडिओला तालुका व जिल्हा स्तरावर यश संपादन केल्याबद्दल दोन्ही शिक्षकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.बारसवाडा व कोळी शिरसगाव येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना अंबड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांनी विद्यार्थी केंद्रभूत मानून शिक्षकांनी दर्जेदार अध्यापन करावे तसेच विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून उपायोजना राबवाव्यात असे आवाहन शिक्षकांना केले. मुख्यमंत्री माझी

शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन मध्ये अंबड तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या बारसवाडा शाळेचा गौरव याप्रसंगी करण्यात आला. उत्कृष्ट प्रशासन अधिकारी म्हणून डोणगावचे केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांनी महादीप संवाद कार्यक्रम,विद्यार्थी सुरक्षा,विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना इत्यादी बाबींचा आढावा घेतला.माजी सरपंच किसनराव गायकवाड यांनी बारसवाडा शाळेतील उल्लेखनीय कार्याचे कौतुक करून आपले मनोगत व्यक्त केले.शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राधाकिसन सावंत यांनी मागील पाच वर्षातील शाळेतील शैक्षणिक,सामाजिक व राष्ट्रीय कार्याचा कार्याचा आढावा घेतला. शाळेच्या विकासामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाकडून मिळालेल्या सहयोगाबद्दल त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक कैलास जाधव, संतोष सावंत,लहू गोल्हार,अर्जुन खोंडे, श्रीधर कुलकर्णी,गोकुळ बोबलट, सुरेखा जाधव यांच्यासह आबासाहेब शिंदे,विष्णू पवार,अशोक घाडगे,संतोष गोळे, नारायण घाडगे,बाळू वाघ,जगदीश पवार,अनिल सावंत,गजानन चिंतामणी,सचिन सावंत,चेअरमन अर्जुन गायकवाड यांनी परिश्रम घेतले.यावेळी दैनिक समर्थ राजयोग वृत्तपत्राचे पत्रकार फारुख शेख,गजानन पुरी, विद्यार्थी,पालक,ग्रामस्थ,डोणगाव केंद्रांतर्गत मुख्याध्यापक व शिक्षक यांची उपस्थिती होती.गावचे सरपंच रामेश्वर खंडागळे,पोलीस पाटील जगन्नाथ माळकरी,तंटामुक्ती अध्यक्ष सुभाषराव मिठे यांनी शाळेचे अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सावंत व श्रीधर कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन गोकुळ बोबलट यांनी केले.

जाहीर प्रगटण

श्री पी.आर. वागडोळे, सह दिवाणी न्यायाधीश व स्तर अंबाजोगाई यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११२ / २०१९

मिनाक्षी भ्र. हनुमंत कुपकर वि. निरंक

ज्यापेक्षा अश्रुबा पांडुरंग कुपकर रा सुर्डी ता. केज जि. बीड हे दिनांक ०४-११-२०१० रोजी मयत झाले आणि अर्जदार नामे (१) सौ. मिनाक्षी भ्र हनुमंत कुपकर वय ३९ धंदा घरकाम रा सुर्डी ता केज जि. बीड. मयत यांचे वारस अर्जदार हे आहेत. अर्जदारांनी सक्सेशन प्रमाणपत्र व प्रोबेट प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात बी.बी. गिते यांच्या मार्फत अर्ज केला आहे.

त्या पेक्षा सदरहू अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर प्रगटणाचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहु परीशिष्ट १ (१) गट क. ५० क्षे १:५२ १ गट क ५१ क्षेत्र क्षेत्र १:५६ (३) गट क ५२ ००:९० (४) गट क. ७६/१/ बी-क्षेत्र ००:३३ एकुण क्षेत्र ०३ हे ८१ आर मौजे सुर्डीला घेण्या करीता प्रोबेट प्रमाणपत्राची आवश्यकता आहे परीशिष्ट २ (१) बीड डी.सी.सी. बैंक शाखा युसुफवडगाव ता. केज जि. बीड खाते क ००४१११००२००६१६६ रक्कम १,७३,९७३ /- (२) सर्वे नं. ५०/२ मौजे सुर्डी ता. केज जि. बीड चे भुसंपादन मावेजा ५८,५४३/- एकुण रक्कम २,३२,५१६ /- रक्कम उचलणे कामी अर्जदाराला सक्सेशन प्रमाणपत्र व प्रोबेट प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

क. लिपीक

अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर अंबाजोगाई

टी सी हरवला

रुक्मीन वाल्मीक गायकवाड माध्यमिक विद्यालय धोंडराई ता.गेवराई धोंडराई गेवराई प्रवासात सातवी चा टीसी हरवला आहे

संपर्क - ९६२३८५७०९९

आदित्य कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी आहेर वडगावात राबवली लसीकरण मोहीम

बीड जिल्ह्यातील आहेर वडगाव येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या जिल्हा बीड येथील आदित्य कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील कृषीकन्या यांनी आहेरवडगाव ता. जि.बीड येथे पशु लसीकरण मोहीम जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम आणि कृषी उद्योग सलग्नता उपक्रम याअंतर्गत राबविण्यात आला त्यावेळी कृषीकन्या लिपाक्षी आघाव वैष्णवी शितोळे प्राची भोंदे आरती फड प्राची कांबळे वर्षदा कव्हर ऋतुजा मुंडे व पशुवैद्यकीय डॉक्टर रामकिसन वारे यांच्या मदतीने करण्यात आले जनावरांना लंपी त्वचारोग आणि खरकुत रोगासाठी लसीकरण यशस्वीरित्या देण्यात आले तसेच जनावरांना पावसाळ्यात होणारे आजार व घ्यावयाची काळजी गोठ्यातील स्वच्छता स्वच्छ पाणी लसीकरण करण्याचे महत्त्व स्वच्छता न केल्याने होणारे रोग व होणारे दुष्परिणाम याबाबतची माहिती शेतकऱ्यांना दिली. पावसाळा हा ऋतू शेती व पशुपालन व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो त्यामुळे पावसामध्ये पशुचे

शास्त्र युक्त संगोपन करणे गरजेचे असते संतुलित आहार पुरवणी प्रतिकूल पुरविणे प्रतिकूल वातावरणात आवश्यक निवारा न दिल्यास तसेच कीटकापासून संरक्षण न केल्यास जनावरे विविध संसर्ग आजारांना बळी पडू शकतात याप्रसंगी मार्गदर्शन करण्यात आले यासाठी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे विषय तज्ञ के .एस. पवार सर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थिनींना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अदितीजी सारडा मॅडम व आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. बी. तांबे सर प्राचार्य सानप सर ग्रामीण जागरूकता अनुभव कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप मोरे सर कार्यक्रम अधिकारी व्ही .बी .शिंदे सर आणि इतर प्राध्यापक वर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी कन्यांनी पशु लसीकरण मोहीम आहेर वडगाव येथे राबवली यावेळी सुमित्रा साळुंखे, बाळासाहेब करंडे ,मयूर राऊत, व इतर गावकरी उपस्थित होते.

चिंतेश्वर संस्थान मठाधीपती ह,भ,प, दिलीप महाराज घोगे यांच्या मातोश्रीचे वृद्धापकाळाने निधन

गेवराई /प्रतिनीधी

चिंतेश्वर संस्थान चे मठाधीपती आदरणीय हभप दिलीप बाबा घोगे (मसाननाथ महाराज)यांच्या आईचे वृद्धापकाळाने निधन झाले असुन त्यांचावर चिंतेश्वर मंदिर परिसरात अंत्यविधी करण्यात आला आहे

येथील चिंतेश्वर संस्थान मठाधिपती हे,भ,प दिलीप महाराज घोगे यांच्या मातोश्री , रुक्मीनबाई घोगे यांचे दि १६ बुधवार रोजी वयाच्या १०३ वर्षे वृद्धापकाळाने निधन झाले .त्यांच्या पश्चात दोन मुले मुलगी नातवंडं परिवार आहे त्यांच्या पार्थीवावर येथील चिंतेश्वर मंदिर परिसरात शास्त्रोक्त विधीने परंपरेने नुसार अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी अंत्यविधीसाठी मोठ्या प्रमाणावर भावनीक जनसमुदाय उपस्थीत होता

एनसीपी, बीजेपी व काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेले डॉ .एस . एस .पटेल गेवराई विधानसभेसाठी इच्छूक

पक्ष गुलदस्त्यातच

गेवराई (प्रतिनिधी)

तालुक्यातील मातोरी येथील मूळ रहिवासी आणि सध्या छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास असलेले उच्चशिक्षित समाजसेवक डॉ . एस . . पटेल हे आगामी विधानसभा निवडणूक गेवराई विधानसभा मतदारसंघातून लढविण्यासाठी उत्सुक असून त्यांनी मतदारांच्या गाठीभेटीना सुरुवात केली आहे .डॉ . शेख शब्बीर महबूब उर्फ डॉ . एस. एस . पटेल या नावाने ते गेवराई तालुक्यात व शिरूर तालुक्यात सर्वांना परिचित आहेत .डॉ . पटेल यांचा प्रवास मातोरीचे सरपंच ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक विभागाचे राज्याचे उपाध्यक्ष असा झालेला आहे . हल्ली छत्रपती संभाजीनगर येथे ते राहत असून गेवराई विधानसभा मतदारसंघात त्यांचे लक्ष आहे . गेवराई तालुक्यातील पूर्वीच्या मातोरी या गावचे ते काही वर्ष सरपंच होते . १९८६ ते २००३ या कालावधीत त्यांनी गेवराईत फिजिशियन डॉक्टर म्हणून उत्तमरित्या जनसेवा केली आहे . त्यानंतर राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे १९९६ ते १९९९ या कालावधीमध्ये ते तालुकाध्यक्ष होते . त्यानंतर १९९९ ते २००४ या कालावधीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे . २००४ ते २००९ या कालावधीत त्यांनी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे . २००६ ते २०११ या कालावधीत ते जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक होते . २०२२ पासून डॉक्टर पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अल्पसंख्यांक विभागाचे राज्याचे उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी पक्ष फुटीपर्यंत होते . येथील सुप्रसिद्ध अष्टविनायक ज्ञानदीप कला वे क्रीडा मंडळाचे ते पदाधिकारी होते . गेवराई तालुक्यात अमर एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून डॉ . पटेल यांनी अनेक ठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये सुरू केले आहेत . अमर एज्युकेशन अँड हेल्थ वेल्फेअर संस्थेचे ते विद्यमान सचिव आहेत . गेवराई शहर व परिसरात त्यांचा दांडगा संपर्क आहे . गेवराई

विधानसभा मतदारसंघात अनेक मातब्बर व नवोदित कार्यकर्ते वेगवेगळ्या पार्टीकडून इच्छुक असतानाच डॉ . पटेल यांनीही विधानसभा निवडणूक लढवण्याच्या चक्रव्यूहामध्ये उडी घेतली आहे . त्यांचा शांत स्वभाव व काम करण्याचा उत्साह यामुळे ते मतदारसंघांमध्ये प्रसिद्ध आहेत . तालुक्यातील जनतेच्या सुखदु:खात, विवाह प्रसंगात ते आवर्जून भेटी देत असतात. माजी विधान परिषद सदस्य तथा वक्फ बोर्डाचे माजी अध्यक्ष एम . एम . शेख यांचे ते छोटे बंधू आहेत .

डॉ . पटेल यांना राजकारणाची तरुणपणापासून आवड असून त्यांची समाजसेवा अविरत चालू असते . एकीकडे महाविकास आघाडी तर दुसरीकडे महायुतीचे शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी अशा पार्टीचे इच्छुक धावपळ करताना दिसत असून यात डॉ . एस . एस . यांच्या नावाची भर पडली आहे . डॉ . पटेल हे माजी राज्यमंत्री गेवराई तालुक्याचे शिल्पकार शिवाजीराव पंडित दादा व अमरसिंह पंडित यांचेही कार्यकर्ते आहेत . मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे ते बालमित्र असून आगामी निवडणुकीत डॉक्टर पटेल एम .आय . एम पार्टी अथवा जरांगे यांच्या आशीर्वादावर गेवराई विधानसभा मतदारसंघात आपले नशीब आजमावतील अशी शक्यता आहे . कारण महाविकास आघाडीच्या वतीने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित व भाजपापासून दूर झालेले विद्यमान आमदार ड . लक्ष्मण पवार यांच्यानंतर महायुतीचे उमेदवार म्हणून विजयसिंह शिवाजीराव पंडित हे सर्वात पुढे आहेत त्यामुळे डॉक्टर पटेल हे पंडितांना सोडून कोणता सवतासुभा निर्माण करीत आहेत हे मात्र समजले नाही . मात्र जरांगेंच्या आशीर्वादावर गेवराई विधानसभा मतदारसंघात ते निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचे जाणवले . गेल्या २०१९ च्या विधान सभा निवडणुकीत ही त्यांनी आपली उमेदवारी दाखल केली होती मात्र माजी आ. अमरसिंह पंडित यांचे बंधू विजयसिंह पंडित यांच्या उमेदवारीमुळे त्यांनी माघार घेतली होती . ते कोणत्या पक्षाकडून अथवा अपक्ष म्हणून निवडणूक लढवतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

बीडमध्ये जगातील अव्वल फ्रीस्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईटची कार्यशाळा

बीड/प्रतिनिधी

बीड येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे टॉप फुटबॉल फ्रीस्टायलर जेमी नाईट यांनी गुरुवारी भेट दिली. त्यांची विविध कौशल्ये दाखवली आणि पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उपक्रमाचा भाग म्हणून कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.तसेच माध्यम प्रतिनिधीशी संवाद देखील साधला.

जेमी नाईट यांनी विद्यार्थ्यांच्या फुटबॉलवरील उत्साहाचे कौतुक केले, भारताला या क्रीडेत जागतिक स्तरावर खेळाडू बनण्याची क्षमता असल्याचे सांगितले.पोदार एज्युकेशन नेटवर्क अशा आंतरराष्ट्रीय कार्यशाळांद्वारे सर्वांगीण शिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जीवन कौशल्ये विकसित करता येतील आणि भविष्यात भारताचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकेल. अशी भावना जेमी नाईट यांनी व्यक्त केली.

पोदार इंटरनॅशनल स्कूल बीड तर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रित करण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी बीड प्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे.

त्याने जगभरात प्रवास केला आहे. जेमीच्या अनन्य साधारण कृतींमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी बोलताना जेमी नाईट म्हणाले, पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल इतका उत्साह, प्रतिभा आणि आवड आहे हे पाहून खूप आनंद झाला. भारत फुटबॉल खेळात जागतिक खेळाडू बनू शकतो आणि कदाचित फुटबॉल विश्वचषकात लवकरच भाग घेईल अशी मी अशा बाळगतो.पोदार

एज्युकेशन नेटवर्कचे संचालक श्री हर्ष पोदार यांनी विद्यार्थ्यांच्या उर्जा आणि उत्कटतेबद्दल आनंद व्यक्त केला. जेमी ने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाविषयी फोकस ठेवणे महत्वाचे आहे हे लक्षात आले.ग्रेड्सपेक्षा जास्त या आमच्या विश्वासावर ठाम राहून, आमच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेतून शिकलेल्या गोष्टींचे अनुकरण करावे असे श्री हर्ष पोदार म्हणाले.यावेळी प्राचार्य गणेश काकडे,

उप प्राचार्य वर्षा नागदे, स्पोर्ट्स डायरेक्टर ज्योती गाला, जनरल मॅनेजर अतुल घरात, प्रशासकीय अधिकारी चेतन गुंजकर यांची उपस्थिती होती.

पोदार एज्युकेशन नेटवर्क बद्दल थोडेसेपोदार एज्युकेशन नेटवर्कची स्थापना शेठ आनंदीलाल पोदार यांनी १९२७ मध्ये केली होती, अगदी सुरुवातीपासूनच, प्रामाणिकपणा, सचोटी आणि सेवा या पारंपारिक भारतीय मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आणि प्रेरित केले गेले. राष्ट्रपिता महात्मा गांधी हे आनंदीलाल पोदार ट्रस्टचे पहिले अध्यक्ष म्हणून या बांधिलकीची साक्ष देतात. शिक्षण क्षेत्रातील ९७ वर्षांहून अधिक अनुभवांसह, पोदार एज्युकेशन नेटवर्क आता १४९ पोदार इंटरनॅशनल स्कूल्सचे नेटवर्क आहे, जे २,५०,००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या पोदार एज्युकेशन नेटवर्कद्वारे पूर्णपणे व्यवस्थापित केले जाते.

आदित्य कृषि महाविद्यालयाच्या कृषिकन्यानी आहेरवडगाव या गावात शेतकऱ्यांना पिवळ्या सापळ्यांची माहिती दिली

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत आदित्य शिक्षण संस्था बीड संचलित , आदित्य कृषि महाविद्यालय बीड येथील कृषिकन्या वर्षदा कव्हर, लिपाक्षी आघाव,प्राची कांबळे,प्राची भोंडे,वैष्णवी शितोळे,आरती फड यांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत आहेरवडगाव या गावात जाऊन तेथील शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना विविध सापळ्याविषयी माहिती दिली तसेच त्यापासून होणारे फायदे समजावून सांगितले व सापळे प्रात्यक्षिक लावून दाखवले . यावेळी शेतकऱ्यांना पडलेल्या प्रश्नाचे निवारण कृषिकन्यानी केले.या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थिनींना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम ,आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तुकाराम तांबे सर, प्राचार्य अमोल सानप सर ,कार्यक्रम समन्वयक डॉ.संदीप मोरे सर , उपक्रम अधिकारी वैभव शिंदे सर व प्राध्यापक विषय तज्ञ प्राचार्य डॉ.स्वाती संत मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

देगलूर-बिलोली मतदार संघात विधानसभेसाठी ३५१ मतदान केंद्रतर एकूण मतदार ३०८३९०

देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी मतदार यादीचा तपशील जाहीर करण्यात आला. याप्रमाणे देगलूर ग्रामीण १५२, शहरी भागात ४६ एकूण १९८ तर बिलोली ग्रामीण भागामधे १२८ आणि शहरी भागात २५ असे एकूण १५३ केंद्र असून, देगलूर-बिलोली मतदारसंघात ग्रामीण व शहरी मिळून एकूण ३५१ मतदान केंद्र असणार आहेत.

देगलूर बिलोली मतदारसंघात पुरुष मतदारांची संख्या १५७९४ तर स्त्री मतदारांची संख्या १५०४३० व इतर १६ अशा एकूण ३०८३९० मतदारांची संख्या आहे. जेष्ठ नागरिक ज्यांचे वय ८५ च्या वर आहे. असे ४०२७, वय वर्ष वयोगटाचे ६६७६ मतदार आहेत, तर २८४२ पीडब्लूडी यात पुरूष १६५८, स्त्री ११८० व इतर तृतीयपंथी ४

९० मतदारांची सख्या आहे. देगलूर विधानसभा मतदारसंघात एसएसटीचे ७ पथके कार्यान्वित केली आहेत. आरटीओचे हाणेगाव, हिप्परगा, भक्तापूर आणि सांगवीउमर, भुतन येसगी, नागणी येथे चेकपोस्ट एफएसटीचे ४, व्हीएसटीचे ६ पथक आणि व्हीव्हीटीचे २ पथक गठीत करण्यात आल्याची माहिती दिली.या निवडणुकीसाठी ३४ झोनल अधिकारी नेमण्यात आले आहेत, तर १२ परदानशील मतदान केंद्र नेमण्यात आले आहेत, अशी माहिती देगलूर-बिलोली विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भरत सूर्यवंशी, बिलोली निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार दीपक मरळे, नायब तहसीलदार रघुनाथसिंह चौहाण, पोलीस निरीक्षक मारूती मुंडे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे

संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे च्या वतीने विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळा संपन्न

आदर्श शिक्षक म्हणून संजय बाळासाहेब समुद्रे यांना सन्मानित

परळी / प्रतिनिधी

संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेचे सचिव पृथ्वी शिंदे यांनी विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन केले होते या कार्यशाळे मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नावरती सखोल मार्गदर्शन प्रा.एम एम सुरनर व प्रा डॉ राहुल गवळे यांनी केले,तसेच कार्यशाळेचे उद्घाटन सचिन जी कागदे यांच्या हस्ते करण्यात आला व संस्थेच्या वतीने आदर्श शिक्षक म्हणून संजय समुद्रे सर यांचा गौरव करण्यात आला. राहुल जगतकर महादेव गीते जगदीश शिंदे सुहास शिंदे सिद्धेश्वर इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले

भिमवाडी बौध्द विहारासह नागरी समस्या त्वरित दुर करा

अन्यथा निवडणूकीत मतदान करायचे का नाही तो विचार करावा लागेल-भैयासाहेब आदोडे

परळी / प्रतिनिधी

गेली सात ते आठ वर्षांपासून भिमवाडी येथील धार्मिक विधी साठी असलेले बौद्ध विहार आधु-या कामामुळे अनुयायांना धार्मिक कार्यक्रम करता येत नाहीत या न.प.प्रशासनाच्या उधासीन धोरणामुळे भिमवाडी या वस्तीतील बोअर बंद,कुठे नाल्या नाही तर कुठे नाल्या भरलेल्या असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याने केवळ मताचे राजकारण करणाऱ्या नेत्यांनी व न.प.प्रशासनाने या कडे त्वरित लक्षकेद्रित करुन कामे करावे अन्यथा होऊ घातलेल्या निवडणूकीत मतदान करावे की नाही अथवा बहिष्कार टाकावा लागेल असा खणखणीत इशाराच सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब आदोडे सर यांनी यावेळी दिला आहे.

सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब आदोडे सर यांनी पुढे बोलताना सांगितले कि,शहरातील एक महत्वाची असलेली भिमवाडी ही एक मोठी वस्ती म्हणून ओळख आहे.या वस्ती कडे केवळ मताचे राजकारण म्हणून न पाहता त्याठिकाणी नागरी सुविधा पण प्रशासनाने किंवा न.पवर सत्ता असलेल्या नेत्यांनी देणे गरजेचे असते याचे भान जाग्यावर आणण्यासाठी होऊ घातलेल्या विधान सभेच्या निवडणूकीवर मतदान करायचे का नाही याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. याचे कारण ही तेवढे च आहे न.प.च्या उधासीन कारभारामुळे गेली कित्येक वर्षांपासून बौध्द विहाराचे रखडुन आहे वेळोवेळी न.प.व.जिल्हा प्रशासनाला निवदनाद्वारे मागणी करुन ही दखल घेतली जात नाही दखल घेतली तरी थातुरमातुर काम करुन वेळमारुन घेतली जाते आज तागायत ते विहार अधुरेच आहे.शिवाय तीन बोअर बंद अवस्थेत आहेत.बौद्ध विहारासमोरील नालीचे कामही अधुरे आहे,पावसाळ्यात अनेक घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाल्याची घटना घडून गेली परंतु आज पर्यंत नुकसान भरपाई दिली गेली नाही यासह अनेक नागरी सुविधा चा अभाव असल्यामुळेच प्रशासनाने जाणीव पुर्वक भिमवाडी कडे लक्ष देणे सोडले कि काय असा प्रश्न उपस्थित करावा लागत आहे.जर प्रशासन किंवा मतावर डोळा ठेवणा-यावर यापुढे मतदान करायचे की नाही याचा विचार करावा लागेल असा भिमवाडीतील नागरिक विचार करत आहेत.

दरीत कोसळून बैलाचा मृत्यू

ऊस तोड मजुराचे कुटुंब उघड्यावर ;मदतीची गरज

किल्लेधारुर/प्रतिनिधी

तालुक्यातील अंजनडोह महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असल्याकारणाने डोंगरावरही शेवाळ पसरलेले आहे त्यात काल रात्री झालेल्या पावसाने भरपूर प्रमाणात त्या ठिकाणी शेवाळ असल्याकारणाने काल दिनांक १७/१०/२०२४ रोजी शिवनगर तांडा येथील शेतकरी व ऊसतोड मजूर गोपीनाथ बालसिंग आडे यांच्या मालकीचे खिलार बैलाचा आईच्या ताडचांकडील शेताकडे दुपारी चारण्याकरिता व पाणी पाजण्या करीता नेत असताना पाय घसरून खोल १०० फूट कोसळून बैलाचा तडपून तडपून

मृत्यू झाला असून मजूर शेतकरी कुटुंब उघड्यावर आले आहे. या बैलाचा मृत्यू झाल्याने शेतकरी शेतमजूर व ऊसतोड कामगाराचे कुटूंब उघड्यावर आले असून त्यांना मदतीचा गरज आहे

या घटनेची माहिती मिळताच तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ.वराडे मॅडम तसेच सहाय्यक शिवाजी नखाते,डोंगरे ईश्वर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून पंचनामा व पि एम केले आहे तरी या शेतकरी कुटुंबाला या दुःखातून सावरण्याकरिता मदतीची गरज आहे तरी या गरीब ऊस तोड मजुराला दानशूर व्यक्तींनी मदत करावी अशी मागणी होत आहे.

संजयगांधी,श्रावणबाळ निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची यादी जाहीर

तुरळ कारणावरून काहींची नावे त्रुटीत

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

धारूर तहसील कार्यालयाने संजय गांधी श्रावणबाळ निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची यादी आचारसंहिते पूर्वी जाहीर केली आहे परंतु यातील अनेक गोरगरीब लाभार्थ्यांची नावे तुरळक कारणावरून त्रुटीत टाकल्याने तसेच अर्ज नामंजूर केल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर पसरला आहे.

गेल्या९ महिन्यापासून निराधार योजनेचे फॉर्म तहसील कार्यालयामध्ये धुळखात पडून होते परंतु आता या लाभार्थींच्या याद्या लावण्यात आले आहेत यात श्रावण बाळ योजनेचे ११५० अर्ज मंजूर झाले आहेत तर ५२४ अर्ज त्रुटी मध्ये ३३६ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. त्याच पद्धतीने

संजय गांधी निराधार योजनेत २५९ अर्ज मंजूर झाले आहेत तर ८२ अर्ज त्रुटीत आहेत ना मंजूर अर्जांची संख्या ५१ आहे. आचारसंहिते पूर्वी याद्या लावल्याने तहसीलदार ,नायब तहसीलदार यांचे अभिनंदन होत आहे परंतु तुरळक कारणामुळे गोरगरीब लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवल्याने नाराजी पसरत आहे ज्या व्यक्तींचे फॉर्म त्रुटी मध्ये आहेत त्यांना त्रूटी पूर्ण करून याच यादीमध्ये त्यांची नावे लावावी अशी मागणी तहसीलदार यांच्याकडे आणि त्यांनी केली आहे लवकरात लवकर यावर निर्णय घेऊन गोरगरीब लाभार्थ्यांना न्याय देण्याची मागणी आता होऊ लागली आहे याद्या लावण्यासाठी तत्कालीन तहसीलदार सुरेश पाळवदे ,नायब तहसीलदार नजीर खूरेशी यांनी

साथीच्या आजारात वाढ,रुग्णालयात गर्दी,वातावरणातील बदलाचा परिणाम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वातावरणातील बदलामुळे लहान मुलांची, वृद्धांची प्रकृती वरचेवर बिघडत असून त्यांना सर्दी,ताप, खोकला अशा प्रकारच्या आजारात वाढ होताना दिसत आहे.शहराच्या विविध भागातील लहान मुले, वृद्ध माणसे यांना विविध आजाराची लागण होत असून त्यांच्या रक्ताची चाचणी केली असता त्यांना व्हायरल फिवर आजार सांगितल्या जात आहे वृद्धा सह तरुण मुले लहान बालके यांचाही मोठ्या समावेश प्रमाणात समावेश आहे. शहरातील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात थंडीताप, पेशी कमी होणे व तत्सम आजाराचे रुग्ण वाढल्याचे दिसत आहेत सध्याची स्थिती लक्षात घेता अधून-मधून पडणारा पाऊस, वातावरणातील बदल, पावसामुळे येणारे दूषित पाणी,परिसरातील वाढती अस्वच्छता या सर्व बाबींचा परिणाम या आजारावर आहे.सर्दी, ताप,खोकला,मलेरिया व श्वसन विकारासह इतर आजारांची चाचण्या होत आहेत सध्या या जीवघेण्या आजाराचे मोठ्या प्रमाणावर थैमान आहे.सर्वच वयोगटातील नागरिकांनाआजाराने घेरले आहे अनेकांना आजाराबाबत गंभीरता वाटत असल्याने ते तात्काळ उपचार घेत आहेत.विविध भागातील घाणीच्या साम्राज्यामुळे डेंग्यु व इतर आजाराच्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे विशेष म्हणजे शहराच्या जुन्या भागात रिपरिप पावसामुळे मोठ्या प्रमाणात घाण निर्माण होते त्यामुळे यातून अनेक प्रकारच्या डासांची निर्मिती होत असून त्यामुळेच साथीच्या आजारांची लागण वाढली आहे अनेक रुग्ण उपचारार्थ दाखल होत आहेत. शिवाय बसस्थानक,मंदिरे आणि गर्दीची ठिकाणे या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पहावयास मिळते त्यामुळे तिथेही आजाराची लागण होत आहे

सोयगाव पोलीस ठाण्याचे लोकार्पण दुसऱ्यांदा आचारसंहितेत अडकले

गृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते होणार होते लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)

गेल्या आठ महिन्यापासून शहरात उभारण्यात आलेल्या सोयगाव पोलीस ठाण्याच्या इमारती च्या लोकार्पण सोहळ्यासाठी लोकसभा निवडणुकीपाठोपाठ आता विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या बडग्यात या इमारतीच्या लोकार्पण सोहळा अडकला आहे त्यामुळे आता सोयगाव पोलीस ठाण्याच्या कारभार आता २०२५ या नवीन वर्षातच नवीन वास्तूमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.सोयगाव शहरात शासनाने पाच कोटी नऊ लक्ष रु निधी खर्चून पोलीस ठाण्याची भव्य वास्तू उभारली फेब्रुवारी२०२४ मध्ये या इमारतीच्या काम पूर्ण झाले होते परंतु लोकसभा निवडणुकीची आचारसंहितेमुळे हे लोकार्पण स्थगित झाले.

मात्र लोकसभा निवडणुकीच्या निकाला नंतर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते (ता .०२) व ता.१५ आगस्ट हे दोन मुहूर्त लोकार्पण सोहळ्यासाठी काढण्यात आले परंतु या दिवशीही लोकार्पण झाले नाही त्यामुळे सप्टेंबरमध्ये जिल्हा पोलीस दलाला या वास्तू चा विसर पडल्याने आता ऑक्टोबर मध्ये पुन्हा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्या मुळे या भव्य वास्तू चा लोकार्पण स्थगित झाला आहे त्यामुळे आता सोयगाव पोलीस ठाण्याचे जानेवारी महिन्यात च लोकार्पण होईल त्यामुळे नवीन वर्षांत सोयगाव पोलीस ठाण्याच्या कारभार नवीन वास्तूत सुरु होईल.

सोयगाव पोलीस ठाण्याचे पूर्णपणे काम झालेली ही भव्य वास्तु फर्निचर सह तयार आहे परंतु आचारसंहितेमुळे आता ही नवीन वास्तू धूळखात पडून आहे वीज जोडणीसह फर्निचर साहित्य आदीने ही वास्तू उभी आहे परंतु लोकार्पण न झाल्याने या वास्तू ची आता पुन्हा तीन महिने साफसफाई करत राहून जानेवारी महिन्यात नवीन वर्षात लोकार्पण करण्यात येण्याची शक्यता आहे.

महिलांनी भूलथापांना बळी पडून रेशनकार्ड ब्लॉक करुन घेऊ नये - एस.एम.युसूफ़

५० रुपयांचा फॉर्म भरून दरमहा ५ हजार रुपये मिळण्याची अफवा

बीड (प्रतिनिधी)

गेल्या काही दिवसांपासून शहरात एक अफवा जोरात फिरू लागली आहे, ती म्हणजे पन्नास रुपयांचा फॉर्म भरून दिल्यास रेशन कार्डधारकांना शासनाकडून दरमहा पाच हजार रुपये मिळणार. असं काहीही शासनाकडून किंवा प्रशासनाकडून अधिकृतरित्या अजूनपर्यंत तरी कळविण्यात आलेले नाही. शिवाय आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झालेली आहे. यामुळे या काळात आता कोणतीही नवीन योजना शासन-प्रशासनाकडून अंमलबजावणीसाठी येण्याची दुरान्वयेही शक्यता नाही. यामुळे रेशन कार्डधारकांनी अशा अफवांना बळी पडू नये आणि आपले रेशन कार्ड ब्लॉक करून घेऊ नये. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.



यांविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, राज्य शासनाने जेव्हापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेद्वारे महिला भगिनींना दरमहा पंधराशे रुपये देण्यास सुरुवात केली, तेव्हापासून सातत्याने काही ना काही योजनांच्या नवनवीन अफवा उडू लागल्या आहेत. यात रेशन कार्डधारक महिलांना दरमहा पाच हजार रुपये मिळणार. दरमहा दीड हजार रुपये आले की नाही हे पाहण्यासाठी अँड्रॉइड मोबाईल नसलेल्या महिलांना शासनाकडून अँड्रॉइड मोबाईल मिळणार. उज्वला गॅस योजनेची जोडणी असलेल्या महिलांना तीन मोफत सिलेंडर सह अजून एक जास्तीचा गॅस सिलेंडर मोफत मिळणार वगैरे अफवांचा बाजार गरम झालेला आहे. सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने उडविलेल्या अफवांच्या कोणत्याही योजना अमलात तर येणार नाहीतच शिवाय मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून देण्यात येणारे दरमहा पंधराशे रुपये सुद्धा आता विधानसभा निवडणुकीनंतर नवीन सरकार स्थानापन्न झाल्यावर नवीन सरकारने ही योजना पुढे चालू ठेवण्याची घोषणा केल्याशिवाय ते सुद्धा महिला वर्गाला मिळतील की नाही याची शाश्वती नाही. तेव्हा महिला वर्गाने कोणत्याही अफवांना, आमिषांना बळी न पडता कुणालाही कुठलाही फॉर्म भरून न देता, तहसील कार्यालय बाह्य कुठलेही ऑनलाइन काम करू नये. काही बनवेगिरी करणारे लोक कोणतेतरी फॉर्म पन्नास रुपये घेत ते भरून त्याचा काहीतरी ऑनलाईन कुटाणा करत असल्याचे चर्चिले जात आहे. ज्या महिला या फॉर्म भरून ऑनलाईन कुटाणा करीत आहे. त्यांचे रेशन कार्ड ब्लॉक होत असल्याचेही बोलले जात आहे. ब्लॉक झालेल्या या महिलांचे रेशन कार्ड पूर्ववत कोण सुरू करून देणार? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. या प्रकरणात पुरवठा विभागासह तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन या सर्वांनी दक्ष राहून कारवाई करण्याची गरज आहे. या मागील अष्टमकुष्टम काय आहे? कोण अशा प्रकारे महिलांना मुर्खात काढून ५० रुपयांसाठी त्यांचे रेशन कार्ड ब्लॉक करत आहे? याचा सोक्षमोक्ष किंवा छडा लावण्याचे कार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा अनेक गोरगरीब महिलांचे रेशनकार्ड ब्लॉक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही बाब लक्षात घेऊन रेशनकार्ड विषयी उडविण्यात आलेल्या अफवांना बळी पडू नका. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

अंशतः अनुदानित शाळांना डिसेंबर २०२४ पुर्वी संच मान्यता द्या

बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीची मागणी

बीड (प्रतिनिधी)

मागील काही दिवसांपुर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के टप्पा वाढ देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. सोमवार दि.१४ रोजी त्यासंबंधीचा शासन आदेश सुद्धा शासनाने काढला आहे. हे अनुदान वितरित करताना शासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४- २५ ची संच मान्यता लागू केली. त्यामुळे या सर्व शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळवण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२४ -२५ ची संच मान्यता असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ ची संच मान्यता डिसेंबर पूर्वी जनरेट करून वितरित करावी अशी मागणी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमिक आणि प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.

याबाबत अधिक माहिती अशी की राज्यातील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मिळावा. यासाठी मागील कित्येक दिवसापासून विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्यात आंदोलन करण्यात आले.शाळा कृती समितीच्या वतीने वेळोवेळी पाठपुरावा करून देखील शासनाने टप्पा वाढी संदर्भात निर्णय घेतला नाही. त्यामुळे विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने पावसाळी अधिवेशनाच्या आधीपासून आंदोलनाला सुरुवात केली. पावसाळी अधिवेशनात शिक्षण मंत्री यांनी अनुदानाचा टप्पा देण्यासंदर्भातली विधिमंडळात घोषणा केली. परंतु अनुदानापासून या शिक्षकांना पुन्हा वंचित ठेवण्याचा शासनाने जाणून-बुजून प्रयत्न केल्याचे या घोषणेवरून लक्षात येताच

विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने कोल्हापूर येथील शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने सनदशीर मार्गाने ७० दिवस धरणे आंदोलन केले. या ७० दिवसांत कृती समितीच्या वतीने वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला. अखेर तब्बल ७० दिवस धरणे आंदोलन केल्यानंतर आंदोलनाच्या ७१ व्या दिवशी शासनाने विना अनुदानित शाळा कृती समितीच्या आंदोलनकर्त्या शिक्षकांना न्याय देण्याची भूमिका घेत गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळाने घेतलेल्या बैठकीत २०% टप्पा वाढीचा निर्णय घेतला. या शासन निर्णयानुसार राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक व वर्ग तुकडया यांना पुढील २०% वाढीव टप्पा अनुदान ०१ जून २०२४ पासून देण्यात यावे व सदरचे अनुदान शैक्षणिक वर्ष सन २०२४-२०२५ ची संच मान्यते मधील मान्यपदांना देण्याबाबत निर्णयामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष सन २०२४-२०२५ मधील ३० सप्टेंबर २०२४ रोजीची पटसंख्या ग्राह्य धरुन राज्यातील सर्व शाळांची संच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता शासनाने जनरेट करुन डिसेंबर २०२४ पर्यंत द्या अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने माध्यमिक आणि प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगरचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे,छत्रपती संभाजी नगरचे निरीक्षक विजयसिंह शिंदे, बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जेष्ठ मार्गदर्शक बापुराव घुले बाळासाहेब सानप, ांनी केली. यावेळी शाळा कृती समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वित्तीय साक्षरता ही काळाची गरज आहे- मा. श्री सावंत मुरहारी

सिरसाळा (प्रतिनिधी)

वित्तीय साक्षरता लोकांना आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जागरूक करते, त्यांना बचत, गुंतवणूक करण्याकरिता प्रवृत्त करते. आर्थिक समर्थता, तसेच आर्थिक व्यवहार चांगल्या पद्धतीने करण्यास साहाय्य करते. ज्यामुळे व्यक्ती व तिच्या कुटुंबाची प्रगती होते. म्हणून वित्तीय साक्षरता काळाची गरज आहे असे मा. श्री सावंत मुरहारी यांनी प्रतिपादन केले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा ता. परळी (वै) जि. बीड अर्थशास्त्र विभाग आयोजित वित्तीय जागरूकता कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रम अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. पाटील, प्रमुख मार्गदर्शक मा. श्री एम.डी. सावंत, अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा संयोजक डॉ बालाजी साबळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एच. पी. कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. वित्तीय साक्षरते बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. श्री. सावंत म्हणाले की,

वित्तीय साक्षरतेच्या अभावामुळे अडचणी येतात. वित्तीय सेवांचा त्याला उचित लाभ घेता येत नाही. वित्तीय साक्षरतेत बँकिंग सेवांची माहिती करून घेणे फार गरजेचे आहे. यात बँका कसे काम करतात, त्यांच्या सेवा-सुविधांचा लाभ कसा घ्यावा याचे जे शिक्षण देण्यात येते त्याला बँकिंग अधिकोशीय साक्षरता शिक्षण असे म्हणतात. भारतात अनेक वर्षांपासून विविध बँका बँकिंगविषयक सेवा-सुविधा जनसामान्यांसाठी उपलब्ध करून देत आहेत. बँकेच्या सेवा सुविधा, विविध योजना, कार्यक्रमांची माहिती, बँकेसंबंधी साक्षरता, प्रबोधन, जागरूकता, सुरक्षितता, उपयोगिता इत्यादींची माहिती बँका जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. याकरिता केंद्र, राज्य सरकार व इतर संस्थांचे सहकार्य घेतले जाते. वित्तीय-साक्षर व्यक्तीची निर्णयशक्ती वाढते. योग्य माहितीच्या आधारे घेतलेले हे निर्णय योग्य तसेच लाभप्रद होण्याची शक्यताही अधिक असते. व्यक्ती आकस्मिक वित्तीय संकटाचा सामना अधिक प्रबळतेने करू शकते.बँकिंग सेवांचा लाभ घेऊ शकते. कर्जातून मुक्ततेसाठी अशा व्यक्ती सुनियोजित प्रयत्न करतात. बचतीकडे वळतात. उपलब्ध आर्थिक माहितीचा विचारपूर्वक प्रयोग करतात. बँकेची महत्त्वपूर्ण ग्राहक होऊ शकते. कौटुंबिक संपत्ती व आर्थिक सुरक्षा वाढते. या कारणांसाठी वित्तीय साक्षरता अत्यंत आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये बँका बहुउद्देशीय भूमिका पार पाडतात. नागरी आणि ग्रामीण भागातील, लघु व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींना बँकिंग सवयी लागाव्यात म्हणून बँका प्रयत्नरत आहेत. लघु उद्योजकांना कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे व स्थानिक लोकांच्या बचती संकलित करण्याचे कार्य या बँका करतात. स्थानिक लोकांशी जनसंपर्क, सहकार्याची भावना यामुळे वित्तीय साक्षरता शिक्षणात बँकिंग शिक्षणास जास्त महत्त्व आहे. भारतीय बँकांनी वित्तीय साक्षरतेसाठी केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार राष्ट्रीय अभियान चालवले आहे. सर्वस्तरातील लोकांना वित्तीय व बँकिंग सेवा-सुविधा कार्यकक्षेत आणणे. बचतीची सवय व उत्पन्न-खर्च यांच्या नियोजनास प्रेरित करणे. बँकिंग क्षेत्रांबाबत विश्वास निर्माण करणे. साक्षरता शिक्षणामध्ये सहभागी होऊन स्तर उंचावण्यास साहाय्य करणे. विविध वित्तीय सेवा-सुविधांची माहिती देणे. बँकांचे साक्षरता व शिक्षणकार्य : वित्तीय साक्षरतेच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टीने बँकांनी विशेष योजना सुरू केली आहे. ज्या क्षेत्रांमध्ये अन्य बँकांच्या शाखा नाहीत अशा ठिकाणी शाखा उघडून बँकिंग सेवा सुरू करणे. माहिती तंत्रज्ञानाचा (वेबसाइट, कोअर बँकिंग, मोबाइल बँकिंग, एटीएम इ.) उपयोग करून बँकिंग सेवासुविधा उपलब्ध करून देणे. इंटरनेट बँकिंग, बिझनेस फॅसीलेटर व बिझनेस सुविधांचा कक्षा विस्तार. वित्तीय साक्षरता-प्रकल्प जाहिराती गाव दत्तक योजना, ग्रामविकास अभियान, केंद्रीय आदर्श ग्राम, शेतकरी, शिक्षण, प्रशिक्षण संपर्क-ग्राहक मित्र इत्यादी. एटीएम, किसान क्रेडिट कार्ड, जनरल क्रेडिट कार्ड त्याचा उपयोग व वित्त-साक्षरतेसाठी व्यक्तींना प्रेरित करावे लागेल आणि याकरिता विशेष अभियान चालवावे लागेल असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.के. पाटील यांनी स्टॉक मार्केट शेअर बाजार गुंतवणूक गुंतवणुकी नंतर येणाऱ्या समस्या सर्वसामान्यांचे होणारे नुकसान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. ए. साबळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्राध्यापक श्रीकांत गव्हाणे यांनी केले. उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. संजय फुलारी यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी मोलाचे सहकार्य केले.

रिपाई(ए)च्या परळी युवक तालुकाध्यक्षपदी रतन रोडे यांची निवड

युवानेते सचिन कागदे यांच्या हस्ते स्विकारले नियुक्ती पत्र

परळी / प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी आँफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री मा. ना. रामदासजी आठवले साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन महाराष्ट्र युवक प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष मा. पप्पूजी कागदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली परळी तालुका युवक अध्यक्षपदी रतन रोडे यांची निवड करण्यात आली.या निवडीचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.

परळी नगर परिषद गट नेते तथा युवकांचे युवकनेते सचिन भाऊ कागदे यांच्या हस्ते नवनिर्वाचित परळी तालुका युवक अध्यक्षपदी रतन रोडे यांना निवडीचे पत्र देण्यात आले.यावेळी रिपाई तालुकाध्यक्ष शरण मस्के, परळी शहराध्यक्ष कार्तिक कांबळे नवनिर्वाचीत तालुका उपाध्यक्ष राजू भुतके, प्रकाश गायकवाड, ओम नागरगोजे, सुधीर रोडे, सुबोध गायकवाड, चाऊस भाई, शाहेद भाई,राहुल रोडे,शाम रोडे,सिद्धार्थ रोडे, दत्ता घनगाव, प्रशांत रोडे दीपक रोडे, रामदास रोडे,कृष्णा वाघमारे अदी रिपाई चे नेते पदाधिकारी उपस्थित होते

याप्रसंगी नवनिर्वाचित परळी तालुका युवक अध्यक्ष रतन रोडे यांना सांगितले कि,रिपब्लिकन पार्टी आँफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री मा. ना. रामदासजी आठवले साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन महाराष्ट्र युवक प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष मा. पप्पूजी कागदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व युवानेते सचिन भाऊ कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी तालुक्यात पक्ष,संघटना वाढविण्यासाठी प्रयत्न करुन

जास्तीत जास्त युवा वर्ग पक्षाकडे आकर्षीत करुन रिपब्लिकन पार्टी आँफ इंडिया ला गतवैभव प्राप्त करुन देणार असल्याचे श्री.रोडे यांनी सांगितले.

गोमाता संगोपन, दुग्ध व मलमुत्र मानवी जीवनासाठी उपयुक्त- रविजी देशमुख

बीड (प्रतिनिधी)

येथील दक्षीणमुखी हनुमान टेकडी संस्थान स्थित राधा कृष्ण, संतोषी माता मंदिरात बुधवारी कोजागिरी पौर्णिमा निमित्त गो पुजन व गो मातेची आरती संपन्न झाली. यावेळी गोमाता संगोपन व दैनंदिन जीवनात गाय व तीच्या पासून दुग्ध व मलमुत्रापासुनची उपयुक्ततेचे महत्त्व रविजी देशमुख यांनी केले. येणाऱ्या सर्व पौर्णिमाला गो पुजन व आरती मंदिरात होणार आहे असे संयोजन समितीने आवाहन करण्यात आले.यावेळी गोमाता पुजन व आरतीसाठी रामेश्वर चांडक, बालाप्रसाद डागा, रवी देशमुख, विष्णुदास बियाणी, डॉ मुरली जेसवानी, इंजि सारडा, बाळकिसन सिकची, आनंद मुदडा, उबाळेकाका , गोकुळ नाईकवाडे, शंकर सुरवसे, गुरखूदे, मानधने बंधू, चव्हान मंदिराचे चिंटु महाराज पांडे व गोभक्तासमवेत आरती करून प्रसाद वितरण करण्यात आले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).